## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्र. रामाआ-नाशिक/तक्रार क्र :१५९/२०२२/अहमदनगर**

| तक्रारदार | प्रतिवादी |
|---|---|
| श्री. दिपक चांदमल वर्मा,<br>रा. ३८५६ लगत माणिक चौक, अहमदनगर,<br>ता. जि. अहमदनगर. | प्रभाग अधिकारी,<br>प्रभाग समिती क्र.२,अहमदनगर महानगरपालिका,<br>अहमदनगर, ता. जि. अहमदनगर. |

**सुनावणी दिनांक ३१/०१/२०२४**

तक्रारदार यांनी दिनांक १३/०४/२०२२ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये दिनांक ३१/०१/२०२४ रोजी आयोजित सुनावणीसाठी विद्यमान जन माहिती अधिकारी उपस्थित असुन अन्य सर्व पक्षकार अनुपस्थित आहेत.

२) तक्रारदार यांनी दिनांक १३/०४/२०२२ रोजीच्या तक्रार अर्जात नमुद केले आहे की,आयोगाच्या आदेशाप्रमाणे अद्याप पावेतो माहिती दिलेली नाही.

३) आयोगाने द्वितीय अपील क्रमांक. ६४०/२०२०/अहमदनगर वरील निर्णय दिनांक ०५/०१/२०२२ अन्वये पुढीलप्रमाणे आदेश दिले आहेत. "विद्यमान जन माहिती अधिकारी तथा प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र.२, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०३/०८/२०१९ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामूल्य पुरवावे."

४) सुनावणीवेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असे नमूद केले की, आयोगाने द्वितीय अपील क्रमांक. ६४०/२०२०/अहमदनगर संदर्भात दि.०५/०१/२०२२ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार तक्रारदारास यांना दि. ३१/०३/२०२२ च्या पत्रान्वये वस्तुस्थितीदर्शक उत्तर तक्रारदारास कळविलेले आहे. त्यामुळे सदरची तक्रार पुढील चौकशी योग्य नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत तक्रार क्रमांक १५९/२०२२/अहमदनगर निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

जावक क्र ओ-२६८ 20 SEP 2024